दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com | RNI No.MAHMAR/2019/79184

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ५ वे ▶ अंक : ३८ वा ▶ बुधवार दि.१३ डिसेंबर २०२३ ▶ किंमत :२ रु. ▶ पृष्ठे :६

खुशखबर... खुशखबर...

खास लोकांच्या आग्रहास्तव

न्यू विजेयंत ट्रॅव्हल्स्, धुळे

पार्सल सेवा व रिटर्न बुकींग उपलब्ध

धुळे ते नागपुर, अमरावती, अकोला

स्लिपर कोच २X१ नॉन एसी बस

रात्री १०.३० वाजेला



संपर्क:- Mo.7035436897, (02562) 236897, 237896

दु.नं.१४, प्रबोधनकार ठाकरे संकुल,धुळे

## न्यूज कॉलम

### धिंगाणा घालणारा पोलिसांच्या ताब्यात

**धुळे ।** पिंपळनेर- नवापूर रस्त्यावरील काकसेवड (ता. साक्री) शिवारातील एका हॉटेलमध्ये मद्यप्राशन करून धिंगाणा घालणाऱ्या तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले. गोटू पांडू देसाई असे त्याचे नाव आहे. धिंगाणा घालताना व हॉटेलमालक चुनिलाल पंडित गावित यांच्या अंगावर धावून शिवीगाळ करताना आढळला. सोमनाथ पाटील यांच्या फिर्यादीवरून गोटू देसाई याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

### दोघांचे डोके फोडले; पाच जणांवर गुन्हा

**धुळे ।** दोंडाईचा (ता. शिंदखेडा) शहरातील पिंपळा चौकात रविवारी शिवीगाळ केल्याच्या कारणावरून ज्योती गणेश पाटील यांच्यासह एकास पाच जणांनी लाकडी दांडक्यांनी मारहाण करीत डोके फोडून जखमी केले. ज्योती पाटील यांच्या तक्रारीवरून लोटन यशंवत पाटील, राज लोटन पाटील, भावना पाटील, मयूरी पाटील, भाग्यश्री पाटील सर्व यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला.

### जुनी पेन्शन योजनेसाठी १४ पासून बेमुदत संप

**धुळे ।** जुनी पेन्शन सर्वांना मंजुर करा या मागणीसह गत सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यावरही कोणत्याही मागणी संदर्भात अंतिम ठोस निर्णय अद्याप होऊ शकला नाही. त्यामुळे कर्मचारी शिक्षक कमालीचे संतप्त झाले आहेत. हा रोष व्यक्त करण्यासाठी राज्यातील १७ लाख कर्मचारी शिक्षकांनी गुरूवारी १४ डिसेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्धार केला आहे.

## कार्यकर्त्यांचा बॅरिकेडस् तोडून आत जाण्याचा प्रयत्न; युवकांची धरपकड

# युवा संघर्ष यात्रा पोलिसांनी रोखली

### कार्यकर्त्यांचा बॅरिकेड्स तोडून आत जाण्याचा प्रयत्न

**मुंबई । प्रतिनिधी**

रोहित पवार यांच्या युवा संघर्ष यात्रेचा आज नागपूर येथे समारोप होत आहे. नागपूरच्या टेकडी परिसरात जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला महाविकास आघाडीतील सर्व नेत्यांनी हजेरी लावली. या सभेनंतर रोहित पवार यांनी त्यांचा मोर्चा थेट विधानभवनावर नेला.

यावेळी पोलिसांनी रोहित पवार यांची संघर्ष यात्रा अडवली आहे. रोहित पवार यांच्यासोबत आलेले कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. नागपूर युवक काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात सहभागी झाले आहेत. यावेळी रोहित पवार, रोहित पाटील यांना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे. मात्र रोहित पवार यांनी रस्त्यावर ठिय्या मांडला होता. त्यांना खासगी वाहनातून नेण्यात आले आहे. संघर्ष यात्रा विधानभवनावर जाणार होती. निवदेन स्विकारण्यासाठी रोहित पवार यांनी सरकारला अल्टिमेट दिला होता. मात्र सरकारकडून कोणीही निवेदन स्विकारायला आले नाही. त्यामुळे रोहित पवार आक्रमक झाले आहेत. रोहित पवार यांनी गेल्या दोन महिन्यांपासून संघर्ष यात्रा काढली आहे. युवकांचे प्रश्न, आरोग्य, शेती विषयक प्रश्नांबाबत ही यात्रा काढण्यात आली होती. या यात्रेचा आज नागपुरात समारोप होता. आमदाराची ही परिस्थिती आहे तर गरीब लोकांची काय परिस्थिती असले?,असे रोहित पवार म्हणाले. ८०० किलोमीटर प्रवास करुन आलेली युवा संघर्ष यात्रेचा आज नागपूरात प्रवेश झाला. त्यानंतर शरद पवार यांच्या उपस्थितीत सभेत भाषण झाली. यावेळी रोहित पवार यांनी सरकारला इशारा दिला होता की, आमचे निवेदन स्वीकारण्यासाठी सरकारने या ठिकाणी यावे, नाहीतर आम्ही विधानभवनात प्रवेश करू. त्यानंतर देखील सरकारकडून दखल घेतली गेली नाही. त्यानंतर कनिष्ठ पदावरील अधिकारी पाठवून आमचे निवेदन स्वीकारणे म्हणजे आमचा अपमान आहे. असे रोहित पवार म्हणाले. त्यानंतर सर्व युवक संतप्त झाले. त्यांनी विधानभवनाकडे मोर्चा वळवला. तेव्हा त्यांना पोलिसांनी अडवले.



### पोलिसांकडून धरपकड सुरु

**पोलिसांनी युवकांची धरपकड करून पोलिस व्हॅनमध्ये टाकण्याचे काम सुरु झाले. त्यामुळे रोहित पवार, रोहित पाटील हे देखील आक्रमक झाले. आम्ही शेतकऱ्यांचे व युवकांचे प्रश्न मांडत आहोत. आम्ही काही गुन्हा केला आहे का, असा सवाल त्यांनी केला? युवकांना तुम्ही ताब्यात का घेत आहात? यावर पोलिस व रोहित पवार यांच्यात शाब्दिक वाद सुरु झाला. युवकांना न्याय मिळत नसेल तर आम्ही काय करायचे, तहसीलदार यांना पाठवून आमचा अपमान का करत आहात, असा सवाल देखील रोहित पवार यांनी केला. आमच्या प्रश्नावर सरकार चर्चा करणार आहे की नाही, असेही ते म्हणाले.**

### रोहित पवार पोलिसांच्या ताब्यात

**या सर्व राडेबाजीनंतर पोलिसांनी रोहित पवार यांना ताब्यात घेतलं. रोहित पवारांना ताब्यात घेतल्यानंतर राष्ट्रवादी आणि युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. रोहित पवार यांनी पोलिसांच्या गाडीजवळ ठिय्या मांडला. कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे परिसरात एकच गोंधळाचं वातावरण पाहायला मिळालं.**

## हिरे वैद्यकीय शासकीय रुग्णालयातील समस्या तातडीने सोडवा : ना.हसन मुश्रीफ यांचे आदेश



### विशेष बैठक आयोजित करण्यात यावी

**धुळे । प्रतिनिधी**

भाऊसाहेब हिरे मेडीकल कॉलेजच्या विविध समस्या पहात त्या सोडविण्यासाठी आ.फारूक शाह यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री यांना विशेष बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी केली होती. त्यानुसार हिवाळी अधिवेशनाच्या काळात नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात ना.मा.हसन मुश्रीफ यांचे अध्यक्षतेखाली वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिकार्यांची बैठक घेण्यात झाली.

या बैठकीत विविध समस्यांवर चर्चा होवून ना. हसन मुश्रीफ यांनी सर्व समस्या तातडीने सोडविण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिकार्यांना दिले आहेत. या बैठकीस संचालक वैद्यकीय शिक्षण विभागाचे श्री.हिरे, श्री.आंधळकर, प्रभारी अधिष्ठाता डॉ. अरुण मोरे,अधिक्षक डॉ.पाठक उपस्थित होते. बैठकीत हिरे मेडिकल रुग्णालयातील वर्ग ४ ची रिक्त पदे, हाउस कीपिंग, कायम स्वरूपी अधिष्ठाता नेमणूक करणे, सीटीस्कॅन मशिन, एमआरआय मशिन खरेदी करणे या प्रमुख समस्यांबाबत चर्चा झाली. तातडीने दोन्ही मशिन खरेदी करण्याचे आदेश ना.हसन मुश्रीफ यांनी दिले. तसेच हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तत्काळ कायम स्वरूपी अधिष्ठाता देण्याची मागणी देखील मान्य करण्यात आली. वर्ग ४ ची रिक्त पदे, हाउस कीपिंग संदर्भात सकारात्मक चर्चा होवून लवकरच मार्ग काढण्याबाबत बैठकीत निर्णय घेण्यात आला. समस्या मार्गी लावल्याबद्दल आ.फारुख शाह यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री ना.हसन मुश्रीफ यांचे धुळेकर जनतेच्यावतीने आभार व्यक्त केले आहेत.

## चिमठाणे गटात थेट तर मेथीत तिरंगी लढत

### १७ रोजी मतदान, १८ रोजी मतगणना

**शिंदखेडा । प्रतिनिधी**

तालुक्यातील चिमठाणे गटात भाजप विरुद्ध शिवसेना (ठाकरे गट) आमने सामने लढत होणार असून मेथी गटात भाजप विरुद्ध काँग्रेस व एक अपक्ष अशी तिरंगी लढत पाहावयास मिळेल. सोमवारी माघारीनंतर चित्र स्पष्ट झाले. चिमठाणे गटातील ९ पैकी ७ उमेदवारांनी नामांकन मागे घेतले. तर मेथी गटातील ९ पैकी ६ उमेदवारांनी माघार घेतली.

चिमठाणे गटात भारतीय जनता पक्षाचे महेंद्रसिंग सुरतसिंग गिरासे आणि शिवसेनेचे (ठाकरे गट) भरतसिंग पारसिंग गिरासे यांच्यात थेट लढत होईल तर मेथी गटात भारतीय जनता पक्षाचे प्रभाकर रघुनाथ पाटील, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे निंबा भूता पाटील आणि अपक्ष दीपक रजेसिंग गिरासे यांच्यात तिरंगी लढत होणार आहे. उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संदीप पाटील, सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार ज्ञानेश्र्वर सपकाळे, नायब तहसीलदार संजय राणे यांनी कामकाज सांभाळले. यावेळी एकच गर्दी उसळली होती. माघारीनंतर लढतीचे चित्र स्पष्ट झाले. यानंतर रिंगणात असणाऱ्या उमेदवारांना उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संदीप पाटील, सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार ज्ञानेश्र्वर सपकाळे, नायब तहसीलदार संजय राणे यांनी निवडणूक चिन्हांचे वाटप केले.

## राजीनामा देणारे सदस्य शरद पवारांना भेटले

**नागपूर । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाबाबत मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य किल्लारीकर यांनी केलेल्या आरोपांना उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये उत्तर दिले. यावेळी त्यांनी शरद पवारांवर हल्लाबोल केला. नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. शासन त्यांचे निर्णय आणि सूचना आमच्यावर लादत होते, असा आरोप राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य बी.एल. किल्लारीकर यांनी केला होता. यावर देवेंद्र फडवणीस यांनी उत्तर दिलेय. सर्वेक्षण कसे करावे आणि त्याची पद्धती काय असावी, हे मागासवर्ग आयोग ठरवीत असते. सरकार नाही.मराठा आरक्षणाचा विषय पूर्णत्वास जाऊ नये आणि तो तसाच खोळंबलेल्या स्थितीत रहावा, अशी ज्या लोकांची इच्छा आहे, असे नागपुरात देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## मेडिकल, एमआरकडून नशेचा काळाबाजार

### धुळ्यात एलसीबीची कारवाई, चौघे ताब्यात

**धुळे । प्रतिनिधी**

धुळे एलसीबी पथकाने केलेल्या कारवाईत गुंगीकारक औषधाचा मोठ्या प्रमाणात साठा जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत चार जणांकडून गुंगीकारक औषधाच्या सुमारे ५८० बाटल्या व नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या पाच हजाराहुन जास्तीच्या गोळ्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

राज्यात सध्या ललित पाटील ड्रग्स प्रकरण मोठ्या प्रमाणात चर्चेचा विषय ठरत असताना धुळ्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात नशेच्या गोळ्या व गुंगीकारक औषधांचा साठा सापडल्यामुळे पोलिसांची मोठी कामगिरी मानली जात आहे. जिल्हा पोलीस अधीक्षकांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे एलसीबीच्या पथकाने ही कारवाई केली. एलसीबीने मोहाडी हद्दीतून एका इसमाला ताब्यात घेतले होते. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे गुंगीकारक औषधाच्या बाटल्या आढळून आल्या. पोलीस या रॅकेटमध्ये सामील असलेल्या आणखी नशेच्या सौदागरांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहेत.



## राजस्थान प्लॅस्टिक इंडस्ट्रीला आग

**नाशिक ।** तालुक्यातील नगाव शिवारात असलेल्या राजस्थान प्लॅस्टिक इंडस्ट्रीज या प्लॅस्टिक रिसायकलिंग करणाऱ्या फॅक्टरीला रविवारी (दि. १०) पहाटे आग लागून कच्चा माल, फर्निचर, कार्यालय असा सुमारे ८० लाखांचा मुद्देमाल जळून खाक झाला. नगाव शिवारातील गट नंबर २०६ मध्ये प्लॉट नंबर एक व दोनवर मुकेश झुनझुनवाला यांच्या मालकीचे राजस्थान प्लॅस्टिक इंडस्ट्रीज ही फॅक्टरी आहे. या फॅक्टरीत टाकाऊ व संकलित केलेले प्लॅस्टिक रिसायकल करून त्यापासून प्लॅस्टिक गिट्टी व उत्पादन मूल्य असलेले प्लॅस्टिक दाणे तयार केले जातात.

रविवारी पहाटे अचानक आग लागली. यावेळी झुनझुनवाला हे मुंबई येथील प्लॅस्टिक उत्पादन व यंत्रांच्या प्रदर्शनास गेले होते. माहिती मिळताच त्यांनी महापालिका अग्निशमन दलाला याची माहिती दिली. अग्निशमन अधीक्षक संजय पवार यांनी अग्निबंब व जवानांसह घटनास्थळी धाव घेऊन दोन तास पाण्याचा मारा करत आग विझवली. मात्र, तोपर्यंत आतील उपयुक्त साहित्य, कच्चा माल, कार्यालय व फर्निचर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते. सोमवारी याप्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

## शासकीय नजराणा रक्कम न भरता सातपुडा संस्थेला २२ एकर जागा



### सखोल चौकशी करा, अन्यथा जनआंदोलन : भगवान करनकाळ

**धुळे । प्रतिनिधी**

देवपूर परिसरातील सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय अध्यक्षाच्या नावे भाडेतत्वावर दिलेली २२ एकर जमीन शासन, प्रशासनाच्या डोळ्यात धुळफेक करीत फुकटात त्यांच्या नावे करण्यात आली आहे. हा गैरप्रकार करणार्या संबंधीत महसूल प्रशासनातील अधिकार्यांवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करावा, याबाबत १५ दिवसांत कारवाई न झाल्यास जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा प्रथम महापौर भगवान करनकाळ यांनी निवासी उपजिल्हाधिकारी श्री.गावंडे यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

मौजे देवपूर येथील सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालयास साधारण ५५ ते ६० वर्षांपुर्वी ९ हेक्टर म्हणजेच २२ एकर जमीन भाडेतत्वावर देण्यात आली होती. नविन शर्तीचा भंग झाल्याने २००२ मध्ये संपुर्ण जागा तत्कालीन जिल्हाधिकार्यांच्या आदेशाने जप्त करण्यात आली. या सातपुडा विद्यालयास लागून ४६/२ब/व४/२अ२ व सर्वे नं.१३१ हे हे सर्व ५०० प्लॉट नवीन शर्तीचे आहेत. ते नजराणा रक्कम भरून देखील अशा प्रकारे मालक अद्याप झालेले नाहीत. यासंदर्भात दिलीप भिका वाघ व कैलास गर्दे यांनी दि.२० फेब्रुवारी २०२३ रोजी तक्रार दाखल केली. याप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी, तहसिलदार, सिटीसर्वे येथील अधिकार्यांवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करावा अन्यथा जन आंदोलन छेडले जाईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर प्रथम महापौर भगवान करनकाळ, मुन्नाभाई पठाण यांची नावे व स्वाक्षर्या आहेत.

## चालकांच्या प्रसंगावधानाने २ बसचा अपघात टळला

**नंदुरबार । प्रतिनिधी**

शहराच्या सद्यःस्थितीत एकमेव बायपास रस्ता असलेल्या बसस्थानकामागील रस्त्यावरील मरीमाता चौकाच्या पुढे असलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांत सोमवारी सकाळी एसटी व खासगी ट्रॅव्हल बसचा अपघात होता होता वाचला. प्रसंगावधान राखून खड्ड्यात विटा टाकल्याने अत्यंत जिकिरीने दोन्ही बसच्या चालकांनी आपली वाहने कशीबशी काढली. त्यामुळे सर्वांनीच सुटकेचा निःश्वास सोडला.

या बायपास रस्त्यावर असलेल्या खड्ड्यांमुळे नेहमीच जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याने संबंधित यंत्रणांनी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सर्वच यंत्रणांनी या रस्त्याकडे साफ दुर्लक्ष केल्याचे शहरात बोलले जात आहे. अशात नागरिकांना रस्ता आहे तसा वापरण्याशिवाय कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याने दररोज शेकडो वाहने नंदुरबारकडे ये-जा करीत असतात. त्यात सोमवारी सकाळी आठच्या सुमारास नंदुरबारकडे जाणारी बस मरीमाता चौकात आली. त्याच वेळी नंदुरबारहून तळोद्याला येणारी खासगी ट्रॅव्हल्स बसदेखील तेथे पोचली. रस्त्यावरील खड्डे चुकवत दोन्ही वाहने जात होती. त्याच वेळी एका मोठ्या खड्ड्यात खासगी बसचे चाक गेल्याने बस तिरकी झाली. शेवटी नागरिकांनी खड्ड्यात विटा टाकल्या व बसचा तोल सांभाळला गेला. त्यात ती बस बाजूला जाणाऱ्या एसटी बसवर आदळता आदळता वाचली.

## पित्याच्या खूनाप्रकरणी मुलाला जन्मठेप

**धुळे । प्रतिनिधी**

भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या पित्यावर चाकूने वार करीत खून करणाऱ्या मुलाला जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. के. मलाबादे यांनी हा निकाल दिला.

सुखराम पेमा पावरा (रा. कढईपाणी-उर्मदा, ता. शिरपूर) असे आरोपीचे नाव आहे. त्याचे पत्नी बायटाबाई पावरा यांच्याशी १६ जून २०२२ ला सायंकाळी साडेसहाच्या सुमारास घरी भांडण सुरू होते. ही घटना पेमा पावरा यांची पत्नी शिमलीबाई पावरा हिने प्रत्यक्ष पाहिली होती. घटनेनंतर सुखराम पळून गेला. त्यानंतर पेमा पावरा यांचा मुलगा विक्रम पावरा शेतातून सायंकाळी घरी आला, तेव्हा त्याच्या आईने त्याच्यासह ग्रामस्थांना घटनाक्रम सांगितला. न्यायालयाने सुखराम पावरा याला जन्मठेपेची शिक्षा व १० हजारांचा दंड सुनावला. तसेच दंड न भरल्यास त्यास एक महिना साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता संजय मुरक्या यांनी कामकाज पाहिले. त्यांना जिल्हा सरकारी वकील देवेंद्रसिंह योगेंद्रसिंह तवर व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता बी. डी. भोईटे यांचे सहकार्य लाभले. तसेच पैरवी अधिकारी जडे व चव्हाण यांनी सहकार्य केले.

## फेरिवाला व्यावसायिकांच्या प्रश्नांवर कारवाईचे फक्त नाटक

धुळे महापालिकेच्या महासभेत विविध विषयावर व समस्येवर चर्चा होते.मात्र फेरीवाला व्यावसायिकांच्या प्रश्नावर चर्चा होतांना दिसत नाही. त्यांच्यासाठी स्वतंत्र जागेवरही कधी चर्चा होताना फारसे दिसत नाही. तर प्रशासनही यावर गांभीर्याने विचार न करता हा विषय आतापर्यंत टाळत आल्याचे दिसत आहे, त्याचे नियोजन किंवा जबाबदारी नेमकी कुणाची असा प्रश्नही नागरींना पडत आहे.

शहरात हल्ली घराबाहेर पडल्यावर कुठेही जायचे असल्यास रस्त्यावर मोकळेपणे चालता येणे, ही अशक्य बाब झाली आहे. रस्त्यांवरील वाढती रहदारी, आणि त्यामुळे होणारी वर्दळ, गैरसोय टाळण्यासाठी रस्त्याच्या कडेला चालावे, तर रस्त्यांची ती बाजू फेरीवाल्यांनी अडवलेली दिसते. त्यामूळे कसरत करीत रस्त्यावरून चालावे लागत आहे. एकुणच वाहतुकीची वाढती कोंडी, धक्काबुक्की, त्यामुळे होणार्या लहान मोठ्या चोर्यांचे प्रकार वाढत आहेत. किरकोळ व्यावसायीकांची दुकाने काढून त्यांचे साहित्य ताब्यात घेण्याचे प्रकार पोलिसांकडून होतात. त्यामुळे पोलिसांच्या विनवण्या करण्यासाठी त्या किरकोळ व्यावसायीकांची खटपट सुरू होते. तर काही फेरीवाले उरलेले सामान घेऊन रस्त्यात सैरावैरा धावतात, कुठेकुठे सामान लपवून ठेवतात आणि अशा धावपळीत रस्त्यावरुन जाणेही धोकादायक होत आहे.दुकानासमोर दोन्ही बाजूने समविषम पार्किंग रेषा मारणे गरजेचे आहे. अधून मधून होणार्या या कारवाईने व्यावसायीकांचीही तारांबळ उडते परंतु त्यानंतर स्थिती जैसे थे होते.

### समस्येकडे दुर्लक्ष का?

**शहरातील विशेषतः हॉकर्सकडून होणाऱ्या अतिक्रमणाच्या मूळ समस्येवर काम होत नाही. 'सकाळ'ने अतिक्रमण निर्मूलन कारवाईपूर्वीदेखील हा प्रश्न मांडला होता. अर्थात हॉकर्स, नो हॉकर्स झोन निर्माण करणे, त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यानंतर कारवाईला अर्थ राहील अन्यथा कारवाईवर होणारा खर्च असाच वाया जाईल हे नक्की.**



### रस्त्यांवर संसार थाटले

**अतिक्रमण निर्मूलनाच्या कारवाईदरम्यान पथकांनी काही विक्रेत्यांचे साहित्य जप्त केले आहे. हे साहित्य परत घेण्यासाठी संबंधित महापालिकेत चकरा मारत आहेत. मात्र, त्यांना दाद मिळत नाही, अशी तक्रार स्थायी समिती सभेत झाली. कारवाईदरम्यान जे पळून गेले त्यांनी पुन्हा रस्त्यांवर संसार थाटले आहेत. ज्यांच्यावर कारवाई झाली ते मात्र आपला संसार परत मिळविण्यासाठी चकरा मारत आहेत अशी ही स्थिती आहे.**



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील
मुख्य उपसंपादक
मो.7057011126

## ग्रामीण डाक सेवक आजपासून बेमुदत संपावर

**धुळे । प्रतिनिधी**

सरकारच्या कामगार विरोधी धोरणांना विरोध करण्यासाठी तसेच प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय ग्रामीण डाक सेवक संघटनेने बेमुदत संप पुकारला आहे. संपाच्या पार्श्वभूमीवर आज डाक सेवकांनी डाक कार्यालयासमोर धरणे देवून आंदोलन केले.

आठ तासाचे काम व पेन्शनसह नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व लाभ द्यावे, नियमित कर्मचार्यांप्रमाणे आर्थिक प्रमोशन १ जानेवारी २०१६ पासून १२-३४-३६ नुसार लाभ व डॉ.कमलेशचंद्र कमिटीच्या सर्व सकारात्मक शिफारशी लागू कराव्यात, गट विमा पाच लाख रुपये पर्यंत वाढवावा, विभागीय कर्मचार्यांप्रमाणे ग्रॅच्युईटीचे सूत्र लावून त्यात वाढ करावी, ग्रामीण डाक सेवकांच्या कुटूंबाला वैद्यकीय सुविधा प्रदान करावी, यासह विविध मागण्यांसाठी ग्रामीण डाक सेवकांनी संप पुकारला आहे. डाक कार्यालयाजवळ सुरु असलेल्या आंदोलनात एम.डी.अहिरे, आर. व्ही. खैरनार, विनोद बागले, पराग कुलकर्णी, कृष्णा वाघ, बी.बी. पाळवे, सी.एस. शिंपी, साहेबराव पाटील, एच.एस.जोशी, एस.के. उपासनी, सुनिल ईशी आदी डाक सेवक सहभागी झाले होते.

## ऐतिहासिक निर्णय

काश्मीरमध्ये पंडितांची होरपळ झाली, त्याचवेळी पाकिस्तानमुळे दिशाभूल झालेल्या असंख्य स्थानिक तरुणांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली. हिंसाचार, अशांतता, कटुता आता भूतकाळ ठरविण्यासाठी सर्वांचाच निर्धार आवश्यक आहे.

जम्मू - काश्मीरचे ३७० वे कलम रद्द करण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या या निर्णयानंतर आता तरी भारतीय राजकारणातून ३७० चा विषय बाद व्हावा! काश्मीरचा कथित प्रश्न आंतरराष्ट्रीय स्तरावर जिवंत ठेवण्यासाठी पाकिस्तानला पुढच्या काळात नव्या क्लुप्त्या शोधाव्या लागतील. जम्मू-काश्मीर आरक्षण विधेयकाला लोकसभेने नुकतीच मंजुरी दिली. त्या पाठोपाठ सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय आला आहे. २०१९ मध्ये भाजप प्रचंड बहुमताने पुन्हा सत्तेवर आल्यानंतर ३७० वे कलम हद्दपार करण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला. या निर्णयानुसार जम्मू-काश्मीरला केंद्रशासित राज्याचा तर लडाखला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला. काश्मीरवर भारताची अधिसत्ता अमान्य करण्याची पाकिस्तानची भूमिका आणि आपल्या राजकीय हितासाठी थोड्या वेगळ्या भाषेत तोच सूर आळविणारे काश्मीरमधील राजकीय नेतृत्व, यातून ३७० वे कलम फुटीरतेचे प्रतिक ठरले. १९५० मध्ये तात्पुरत्या स्वरुपात राज्यघटनेद्वारे अस्तित्वात आलेले हे कलम पाहता-पाहता राजकीय हत्यार बनले. या कलमाचा संबंध काश्मीरमधील स्थानिक रहिवाशांच्या अस्मितेशी जोडला गेला. वास्तविक भारताच्या अन्य राज्यांप्रमाणे जम्मू- काश्मीरमध्येही घटनात्मक मार्गाने विधानसभा निवडणुका होऊन वेळोवेळी लोकनियुक्त सरकार अस्तित्वात आले. मात्र दुर्दैवाने राज्याला अग्रेसर बनविण्याऐवजी बहुतेक राज्यकर्त्यांनी स्वतःचा स्वार्थ पाहिला. स्थानिक नागरिकांमधील नाराजी आणि अस्वस्थतेचा पुरेपूर फायदा पाकिस्तानने करून घेतला आणि यातून काश्मीरची समस्या चिघळली.

आयोग नेमण्याची शिफारस

३७० वे कलम रद्द करण्याच्या निर्णयावर देशात उमटलेली प्रतिक्रिया अनुकूल होती. आताही सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचे अपवाद वगळता स्वागत होत आहे. अपवाद अर्थातच जम्मू-काश्मीरमध्ये ज्यांनी सत्ता गाजवली केवळ त्यांचा आहे. पीडीपीच्या नेत्या मेहबूबा मुफ्ती यांनी 'मृत्युदंड' अशा अशोभनीय शब्दांमध्ये प्रतिक्रिया दिली आहे. माजी मुख्यमंत्री गुलाम नबी आझाद यांनी 'निराशाजनक' निकाल, असे वर्णन केले आहे, तर नॅशनल कॉन्फरन्सचे नेते उमर अब्दुल्ला यांनी संघर्ष सुरूच ठेवण्याची घोषणा केली. दीर्घकालीन लढाईची आमची तयारी आहे, असे ते म्हणत आहेत. ही लढाई कोणाविरुद्ध? भिन्न राजकीय विचारधारेमुळे भाजप अथवा त्याच्या मित्रपक्षांना अन्य विचारधारेच्या कोणत्याही पक्षाचा असलेला विरोध समजून घेता येईल; पण बहुमताने भारतीय संसदेने ज्याला मंजुरी दिली, ज्या निर्णयावर सरन्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने शिक्कामोर्तब केले त्याविरुद्ध भूमिका कोणाच्याच पचनी पडणारी नाही. जम्मू-काश्मीरमध्ये लवकरात लवकर निवडणुका घ्याव्यात, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. जम्मू-काश्मीरमधील सर्वसामान्य नागरिकांचे हित महत्त्वाचे आहे, की भावनिक मुद्द्यांवर त्यांना खेळवत राहणे? याचे उत्तर विसंवादी सूर आळवणार्या राजकीय नेत्यांनी दिले पाहिजे. तथाकथित वेगळेपण जपण्याच्या नादात जम्मू-काश्मीरसारखे सीमावर्ती राज्य काही दशके अशांत राहून त्याची किंमत तेथील नागरिकांनाच नव्हे, तर संपूर्ण देशाला मोजावी लागली आहे. अस्मितेच्या आधारावर राजकीय खेळी कदाचित यशस्वी करता येतील; पण त्यातून निर्माण होणारी वेगळेपणाची भावना फुटीरतेच्याच दिशेला नेणारी ठरते, हा धडा ३७० व्या कलमामुळे मिळाला आहे. खंडपीठाने निकाल देताना ३७० वे कलम स्थायी स्वरूपाचे नव्हते, याकडे निर्देश करतानाच जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या मानवी हक्काच्या उल्लंघनाकडे दुर्लक्ष केलेले नाही. न्यायमूर्ती संजय किशन कौल यांनी यासंदर्भात भाष्य करताना केंद्र सरकारला चौकशीसाठी आणि सलोखा टिकविण्याबाबत शिफारशीसाठी आयोग नेमण्याची सूचना केली आहे. त्यांची भूमिका स्वागतार्ह असली तरी ती स्वीकारताना जखमा पुन्हा भळभळणार नाहीत याची विशेष दक्षता घ्यावी लागेल.

## सार्वभौमता आणि अखंडतेला दिले प्राधान्य

भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने ११ डिसेंबर रोजी कलम ३७० आणि ३५ (ए) रद्दबातलसंदर्भात ऐतिहासिक निर्णय दिला. या निकालाद्वारे न्यायालयाने देशाची सार्वभौमता आणि अखंडतेला प्राधान्य दिले आहे. प्रत्येक भारतीयाच्या मनातही हीच भावना आहे. ५ ऑगस्ट २०१९ रोजी घेण्यात आलेला निर्णय घटनात्मक एकात्मता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला, विघटित करण्यासाठी नव्हे; याची नोंद सर्वोच्च न्यायालयाने घेतली. कलम ३७० कायमस्वरूपी नव्हते, या बाबीची दखलही न्यायालयाने घेतली.



जम्मू, काश्मीर आणि लडाखचा नितांत सुंदर निसर्ग, शांततेची अनुभूती देणारी खोरी, भव्य डोंगर कलाकारांना आणि साहसीवीरांना पिढ्यानपिढ्या साद घालत आली आहेत. हे असे स्थान आहे, जिथे उदात्तता आणि अलौकिकता यांचा संगम होतो, जिथे हिमालय आकाशाला गवसणी घालतो आणि सरोवरे आणि नद्यांचे निखळ पाणी स्वर्ग प्रतिबिंबित करतात. मात्र गेल्या सात दशकांपासून या ठिकाणांनी हिंसाचाराचे उग्र रूप आणि अस्थैर्य अनुभवले.

दुर्दैवाने शतकांच्या वसाहतवादामुळे, आर्थिक आणि मानसिक दमनामुळे आपण एक प्रकारे गोंधळलेला समाज बनलो. अतिशय मूळ गोष्टींबाबत स्पष्ट भूमिका घेण्याऐवजी आपण गोंधळाकडे नेणाऱ्या द्विधा भूमिकेला मान्यता दिली. दुर्दैवाने जम्मू आणि काश्मीर अशा मानसिकतेचा मोठा बळी ठरले. स्वातंत्र्याच्या वेळी आपल्याला राष्ट्रीय एकात्मतेची नवी सुरवात करण्याचा पर्याय होता. त्याऐवजी दीर्घकालीन राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करणारा असला तरी आपण गोंधळलेला समाज राहू देण्याचा निर्णय घेतला. माझ्या जीवनाच्या अगदी सुरुवातीपासूनच जम्मू आणि काश्मीर आंदोलनाशी जोडले जाण्याची संधी मला मिळाली. जम्मू आणि काश्मीर हा केवळ राजकीय मुद्दा नाही, अशा वैचारिक चौकटीशी मी बांधील आहे, तर समाजाच्या आकांक्षाची दखल घेण्याचा हा मुद्दा आहे.

डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी नेहरू मंत्रिमंडळात महत्त्वाचे खाते संभाळत होते आणि दीर्घकाळ सरकारमध्ये राहू शकले असते. तरीही काश्मीर मुद्द्यावर ते मंत्रिमंडळातून बाहेर पडले आणि त्यांनी पुढचा खडतर मार्ग स्वीकारला, जो त्यांच्या जीवावर बेतला. त्यांचे प्रयत्न आणि त्याग यामुळे काश्मीर मुद्दा कोट्यवधी भारतीयांशी भावनिकदृष्ट्या जोडला गेला. त्यानंतर काही वर्षांनी अटलजी यांनी 'इन्सानियत', 'जम्हूरियत' आणि 'काश्मिरीयत' हा प्रभावी संदेश दिला जो सदैव स्फूर्तीचा मोठा स्त्रोत ठरला.

माझा हा कायम विश्वास होता की, जम्मू आणि काश्मीरमध्ये जे काही झाले, ती आपल्या देशाची आणि तिथे राहणाऱ्या लोकांचीही मोठी फसवणूक होती. देशावरचा हा कलंक, तिथल्या लोकांवर झालेला अन्याय दूर करण्यासाठी मला जे काही करता येईल, ते करण्याची माझी तीव्र इच्छा होती. जम्मू आणि काश्मीरच्या जनतेची दुःखे, त्यांच्या वेदना दूर करण्याचीही माझी कायमच इच्छा होती.

अगदी साध्या आणि स्पष्ट शब्दांत सांगायचे तर- कलम ३७० आणि ३५ (अ) हे त्यातील महत्त्वाचे अडथळे होते. असे वाटत होते की, हे अनुच्छेद म्हणजे जणू एखादी भक्कम भिंत आहे आणि त्या अडथळ्याचा त्रास पीडा होत होता, गरीब आणि दुर्बल लोकांना. अनुच्छेद ३७० आणि ३५ (अ) मुळे, जम्मू-काश्मीरच्या नागरिकांना त्यांचे हक्क आणि त्यांच्या इतर सर्व देशबांधवांना मिळणारी, तेवढ्याच हक्काची विकासाची फळे त्यांना कधीही मिळाली नसती. या कलमांमुळे, एकाच देशात राहणाऱ्या लोकांमध्ये एक अंतर निर्माण झाले होते. या अंतरामुळे, जम्मू-काश्मीरच्या समस्या दूर करण्यास इच्छुक लोकांना, कितीही इच्छा असली, तरीही काही करता येत नव्हते, तिथल्या लोकांचा त्रास दिसूनही त्यांना त्याकडे हतबलपणे बघावे लागत होते.

एक कार्यकर्ता म्हणून, मी गेली कित्येक दशके हा प्रश्न जवळून पाहिला आहे, त्यामुळेच मला या समस्येशी संबंधित निश्चित गोष्टी आणि त्यातील गुंतागुंत याची जाणीव होती. आणि तरीही, एका गोष्टीबाबत मात्र मला स्वच्छ माहिती होती की, जम्मू आणि काश्मीरच्या लोकांना विकास हवा आणि तो त्यांना त्यांची बलस्थाने आणि कौशल्ये यांच्या बळावर, भारताच्या विकासात योगदान द्यायचे आहे. त्यांना त्यांच्या मुलांसाठी एक उत्तम आयुष्य, चांगले, हिंसाचार आणि अनिश्चिततेपासून मुक्त आयुष्य आणि भविष्य हवे आहे. म्हणूनच, जम्मू आणि काश्मीरच्या लोकांची सेवा करताना आम्ही तीन स्तंभांना प्राधान्य दिले. नागरिकांच्या समस्या समजून घेणे, त्यांना पाठबळ देणाऱ्या कृतींद्वारे जनतेत विश्वास निर्माण करणे आणि तिसरे, विकास, विकास आणि केवळ विकासाला प्राधान्य देणे.

२०१४ मध्ये आम्ही कार्यभार स्वीकारल्यानंतर लगेचच जम्मू-काश्मीरमध्ये भीषण पूर आला आणि काश्मीर खोऱ्याचे मोठे नुकसान झाले. सप्टेंबर २०१४ मध्ये मी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी श्रीनगरला गेलो होतो परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी. पुनर्वसनासाठी विशेष सहाय्य म्हणून १००० कोटी रुपयांच्या मदतीची घोषणा केली होती, संकटग्रस्त लोकांना पाठिंबा देण्याच्या आमच्या सरकारच्या वचनबद्धतेचे हे द्योतक होते. त्यावेळी मला विविध क्षेत्रांतल्या लोकांना भेटण्याची संधी मिळाली. त्यांच्याशी झालेल्या संवादांमध्ये एक समान धागा होता- लोकांना केवळ विकासच नको होता तर त्यांना अनेक दशकांपासून पसरलेल्या भ्रष्टाचारापासूनही स्वातंत्र्यही हवे होते. त्याच वर्षी, जम्मू-काश्मीरमध्ये ज्यांनी आपले प्राण गमावले, त्यांच्या स्मरणार्थ मी दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला. दिवाळीच्या दिवशी जम्मू-काश्मीरमध्ये राहण्याचाही मी निर्णय घेतला.

जम्मू आणि काश्मीरच्या विकास यात्रेला आणखी बळ देण्यासाठी आमच्या सरकारमधील मंत्री तिथे वरचेवर भेट देतील आणि लोकांशी थेट संवाद साधतील, असा निर्णय आम्ही घेतला होता. जम्मू-काश्मीरमध्ये सद्भावना निर्माण करण्यात या मंत्र्यांच्या दौऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मे २०१४ ते मार्च २०१९ पर्यंत १५० हून अधिक मंत्रीस्तरीय दौरे झाले. हा स्वतःच एक विक्रम आहे. २०१५ मध्ये जाहीर केलेले विशेष पॅकेज जम्मू आणि काश्मीरच्या विकासात्मक गरजा पूर्ण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. त्यात पायाभूत सुविधांचा विकास, रोजगार निर्मिती, पर्यटनाला चालना आणि हस्तकला उद्योगाला मदत पुरवण्यासाठी पुढाकार घेण्यात आला होता.

युवकांची स्वप्ने साकार करण्याची खेळांची क्षमता ओळखून आम्ही जम्मू आणि काश्मीरमध्ये विविध खेळांच्या सामर्थ्याचा उपयोग केला. क्रीडा उपक्रमांद्वारे, त्यांच्या आकांक्षा आणि भविष्यावर लक्ष्य साध्य करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा परिवर्तनात्मक प्रभाव आपण पाहिला. स्पर्धेच्या आयोजनाच्या ठिकाणी सुधारणा करण्यात आल्या, प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले तसेच प्रशिक्षक उपलब्ध करून देण्यात आले. स्थानिक फुटबॉल क्लबच्या स्थापनेला प्रोत्साहन देणे ही सर्वात अनोखी गोष्ट होती. त्याचे उत्तम निकाल दिसून आले. डिसेंबर २०१४ मध्ये अफशान आशिक या प्रतिभावान फुटबॉलपटूचे नाव माझ्या मनात आले. ती श्रीनगरमध्ये दगडफेक करणाऱ्या एका गटाचा भाग होती; परंतु योग्य वेळी प्रोत्साहन मिळाल्यामुळे ती फुटबॉलकडे वळली, तिला प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवण्यात आले आणि तिने खेळात प्रावीण्य मिळवले. मला आठवतंय, मी तिच्याशी एका 'फिट इंडिया' कार्यक्रमात संवाद साधला होता, त्यात मी म्हणालो होतो की, 'बेंड इट लाइक बेकहॅम' मागे सारायची ही वेळ आहे कारण, आता 'एस इट लाइक अफशान' आहे. इतर युवकही किकबॉक्सिंग, कराटे आणि अन्य क्रीडा प्रकारांत आपली चमक दाखवू लागले आहेत.


पंचायत निवडणुका हा देखील या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाच्या वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण क्षण होता. पुन्हा एकदा, आमच्यासमोर सत्तेत राहण्याचा किंवा आमच्या तत्त्वांचे पालन करण्याचा पर्याय होता. ही निवड करणे काही कठीण नव्हते आणि आम्ही सत्ता सोडली, मात्र आम्ही आमच्या आदर्शांना, जम्मू आणि काश्मीरच्या लोकांच्या आकांक्षाना सर्वोच्च प्राधान्य दिले. पंचायत निवडणुकीतील यशाने जम्मू आणि काश्मीरमधील लोकांचा लोकशाही स्वभाव दाखवून दिला. मला तिथल्या गावांच्या प्रधानांशी झालेला संवाद आठवतो. इतर समस्या लक्षात घेऊन, मी त्यांना एक विनंती केली - काहीही झाले तरी शाळा जाळल्या जाऊ देऊ नका आणि तसे होणार नाही हे पाहा. त्याचे पालन झाल्याचे पाहून मला आनंद झाला. कारण जर शाळा जाळल्या, तर सर्वात जास्त नुकसान लहान मुलांचे होते.

५ ऑगस्ट हा ऐतिहासिक दिवस प्रत्येक भारतीयाच्या हृदयात कोरलेला आहे. आपल्या संसदेने कलम ३७० रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय मंजूर केला. तेव्हापासून जम्मू, काश्मीर आणि लद्दाखमध्ये बरेच काही बदलले आहे. आता चार वर्षांनी डिसेंबर २०२३ मध्ये न्यायालयाचा निकाल आला असला तरी जम्मू, काश्मीर आणि लद्दाखमधील विकासाची लाट पाहून, लोकांच्या न्यायालयाने कलम ३७० आणि ३५(अ ) रद्द करण्याच्या संसदेच्या निर्णयाला जोरदार समर्थन दर्शवले आहे.

राजकीय स्तरावर, तळागाळातील लोकशाहीवर पुन्हा विश्वास निर्माण झाल्याचे गेल्या ४ वर्षांनी पुन्हा अधोरेखित केले आहे. महिला, आदिवासी,अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि समाजातील उपेक्षित घटकांना त्यांचे हक्क मिळत नव्हते त्याच वेळी, लद्दाखच्या आकांक्षांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले गेले होते. ५ ऑगस्ट २०१९ या तारखेने हे सर्व बदलले. सर्व केंद्रीय कायदे आता निर्भयपणे आणि निःपक्षपणे लागू होत असून प्रतिनिधित्व देखील अधिक व्यापक झाले आहे. त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आहे, बीडीसी निवडणुका झाल्या आहेत, दुर्लक्षित राहिलेल्या निर्वासित समुदायाने विकासाची फळे चाखायला सुरुवात केली आहे.

प्रमुख केंद्र सरकारी योजनांनी संतृप्ततेची पातळी गाठली आहे, अशा प्रकारे या योजना समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचल्या आहेत. यामध्ये सौभाग्य, उज्ज्वला योजनांचा समावेश आहे. गृहनिर्माण, नळपाणी योजना आणि आर्थिक समावेशनात मोठा पल्ला गाठला गेला आहे. एरव्ही लोकांसाठी एक मोठे आव्हान असलेल्या आरोग्यनिगा क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात अद्यावतीकरण झाले आहे. सर्व गावांना ओडीएफ प्लस दर्जा प्राप्त झाला आहे. एकेकाळी भ्रष्टाचाराचे कुरण असलेल्या आणि ओळखी आणि शिफारशींचे क्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरकारी नोकऱ्यांमधील पदे पारदर्शक आणि योग्य प्रक्रियेच्या माध्यमातून भरली जात आहेत. आयएमआरसारख्या इतर निर्देशांकांमध्येही सुधारणा दिसत आहे. पायाभूत सुविधा आणि पर्यटनाला चालना मिळाली असून त्याचा लाभ सर्वांना होत असल्याचे दिसत आहे. साहजिकच याचे श्रेय जम्मू आणि काश्मीरच्या जनतेच्या चिवट वृत्तीला आहे, ज्यांनी सातत्याने हे दाखवून दिले आहे की, त्यांना केवळ विकास हवा आहे आणि सकारात्मक बदलाचे कारक बनण्याची त्यांची इच्छा आहे. जम्मू, काश्मीर आणि लडाखच्या परिस्थितीबाबत पूर्वी प्रश्नचिन्ह असे. आता त्या जागी विक्रमी वृद्धी, विक्रमी विकास, पर्यटकांचा विक्रमी ओघ याबाबतची केवळ उद्गारचिन्हे आहेत.

## शब्दकोडे-२६०



**आडवे शब्द**

१. बिकट ६. आजपर्यंत १०. डाळीचे कालवण ११. टप्प्या टप्प्याने केलेला प्रवास १५. दोन्ही हातांच्या बोटांची संख्या १६. धातूची तार काढणारा १७. अडत्या १९. वस्त्र, कापड २२. संताप, चीड २५. एक ज्वालाग्राही पदार्थ २६. तत्काळ चपखल उत्तर देणारा २७. सरसरीत २९. काळ्या तोंडाचे मोठे माकड ३०. वारा, वायू, हवा ३१. सारखा, तुल्य ३२. भारतीय सैनिक ३३. घोड्याला बांधण्याची जागा ३४. फट, खड्डा ३६. तोफगाडी ३७. वाईट सवयी असलेला ३८. बालीशपणा ४१. आई ४२. गरीब ४३. वाळवंट ४५. एक शेंगभाजी ४७. गुलबक्षी रंगाचा हिच्याशी काय संबंध? ४८. सोन्या चांदीचा व्यापारी ४९. शिव्याशाप ५०. श्रीमान, श्रीयुत ५२. चुरूचुरू ५३. चक्र ५५. आटोपणे, साफसफाई करणे ५७. उलटी, ओकारी ६०. वितरण ६२. केसांची बट ६३. धमनी ६४. कायदेशीर ६६. लत्ताप्रहार ६७. छळ ६८. अहंकार ६९. पाणकोंबडा ७१. आठवण ७२. गुणाकार ७३. मध्यम प्रमाण ७४. फुलांचा वाफा ७५. वृत्तपत्र ७७. कुंपण ७८. जम ७९. चक्षु, डोळे ८०. देवाला घातले जाणारे 'संकट'

**उभे शब्द**

१. इंद्रिय २. आशीर्वाद ३. मोठा हातोडा ४. संध्याकाळ ५. पोट ६. सगळ्यात महत्त्वाचा दिवस ७. त्वरित ८. बेसावध ९. मनाची घालमेल, तडफड ११. राजाचे संबोधन १२. वेल १३. दागदागिने १४. चामखीळ १८. मिंधा २०. सोशिकपणा २१. दृष्टी, टक २३. गाठोडे २४. सुस्ती, कंटाळा २५. राजमहाल २८. युद्ध ३०. लिहिलेले वाचणारा ३२. इतरांपेक्षा निराळा ३३. अत्यंत तहान लागणे ३४. लोणच्यातील द्रव ३५. चिक्कू मनुष्य ३७. लग्न न झालेली ३८. मूल ३९. शेंगेवरील आवरण ४०. चंद्राची कड ४४. कपाळभर लावलेले कुंकू ४६. मार्गक्रमण ४७. मीठ ४९. समशेर ५१. मुसलमान ५४. बडबड, त्रास ५६. गुरांना गावाबाहेर कुरणात चरण्याबद्दल द्यावे लागणारे द्रव्य ५८. माज ५९. सुदैवी ६१. पळून जाणे ६४. संपूर्ण ६५. दात ६७. संथ गतीने चालणारा प्राणी ६८. 'श्रीमंत'च्या विरुद्ध ७०. गीत, गाणे ७१. सारखा ७२. छापील निवेदन ७४. आलाप, लकेर ७६. अर्धी ओंजळ

### शब्दकोडे-२६० चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.व्यवसाय ५.पदरमोड ९.पाडवा ११.दामोदर १४.दरसाल १६.साहस १८.कारण १९.बालक २०.धवल २२.मातकट २४.वरवर २५.मन २६.वन २८.टणक २९.अवदसा ३०.कटी ३१.सुधा ३४.सामना ३५.नमस्कार ३६.माड ३७.रचनाकार ३८.वय ४०.नसता ४२.मोर ४४.दमामा ४६.सरदार ४८.खल ४९.नंदलाल ५०.कस ५२.रणगाडा ५४.पार्वती ५५.लकवा ५७.महामानव ५९.खोड ६०.विना ६२.कोठार ६५.सव्वाशेर ६६.नाचा ६७.रया ६९.मधुकर ७०.हमाल ७१.तातडी ७३.सीता ७४.कुडी ७६.नारद ७८.राजकारण ८०.जाणता राजा ८१.भू ८२.मलम ८३.रसबाळी

**उभे उत्तर**

२.वसाहत ३.यदा ४.पदरव ६.दरबार ७.मोदक ८.डर ९.पालव १०.वाचा १२.मोका १३.रणरण १५.साधनसामग्री १६.सामानसुमान १७.सकट २१.लवकर २३.टणत्कार २५.मदन २७.नटी २९.अनावर ३२.धाडस ३३.विनाकारण ३४.सार ३९.सीमा ४१.तास ४२.मोल ४३.विनंती विशेष ४४.दलाल ४५.मालक ४७.दारवठा ४८.खडा ५०.कमतरता ५१.सहा ५३.गाज ५४.पाडस ५६.वाटचाल ५८.नकोसा ६१.नार ६३.रमताराम ६४.नकलाकार ६६.नामानिराळा ६८.यातना ७२.डीर ७४.कुणबा ७५.सणक ७७.दम ७९.रस

## दुध दरवाढीसाठी आंदोलन करताना दुध रस्त्यावर ओतणे आवश्यक आहे का?

पशु खाद्याचे भाव गगनाला भिडत असताना दुधाचे भाव वाढवण्यासंदर्भात सरकार गंभीर नाही, सरकारच्या या उदासीनतेचा निषेध करण्यासाठी दूध उत्पादक शेतकरी ठिकठिकाणी रस्त्यावर दूध ओतून आंदोलने करत आहेत. शेतकऱ्यांच्या या आंदोलनात आता राजकीय पक्षांनीही उडी घेतली आहे. दुधाला किमान ३४ रुपये दर मिळावा आणि पशुखाद्याचे भाव कमी करण्यात यावेत या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन केले जात आहे. खाजगी आणि सहकारी दूध संघांचे आणि दूध कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच सरकारी अधिकारी यांचा समावेश असलेल्या समितीने दर तीन महिन्यांनी दूध खरेदीदर ठरवावेत, दूध संघांनी आणि कंपन्यांनी यानुसार दर द्यावेत असे दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांनी जाहीर केले होते. मात्र दूध कंपन्यांनी हा आदेश न जुमानता दुधाचे दर आणखी उतरवले त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी आंदोलन अधिक तीव्र केले. दूध संघ आणि दूध कंपन्या संगनमत करून हे दर पाडत असताना सरकार मात्र त्यामध्ये हस्तक्षेप करत नाही. याप्रकरणी सरकारने तत्परतेने लक्ष घालून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला नाही, तर मंत्रालयात दूध ओतण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

दूध उत्पादक शेतकरी आणि सरकार यांमध्ये दुधाच्या दरावरून सातत्याने मतभेद सुरु असतात. सरकारचा निषेध करण्यासाठी शेतकरी दरवेळेस दूध रस्त्यावर ओतून सरकारचा निषेध करत असतो. ज्यामुळे हजारो लिटर दूध निव्वळ वाया जाते. आंदोलनांत 'रस्त्यांवर दूध ओतून अन्नपदार्थाची नासाडी करणे योग्य नाही,' अशा आशयाचे एक पत्र एका निवृत्त न्यायमूर्तींनी मुख्य न्यायमूर्तींना लिहिले होते. त्याची दखल घेऊन उच्च न्यायालयाने याप्रश्नी सुओ मोटो जनहित याचिका दाखल करून घेतली होती. मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग आणि न्या. नितीन जामदार यांच्या खंडपीठाने यात कोणताही आदेश न देता ही याचिका निकाली काढली. 'आपल्या व्यथांकडे लोकांचे लक्ष वेधण्यासाठी दूध उत्पादकांनी स्वत:हूनच आपले दूध उत्पादन रस्त्यांवर ओतले असेल, तर तो त्यांच्या निषेध नोंदवण्याच्या हक्काचा भाग आहे. लोकशाहीत निषेध नोंदवण्याचा हक्क संकुचित केला जाऊ शकत नाही,' असे मत खंडपीठाने याचिका निकाली काढताना नोंदवले. तसेच अन्नपदार्थाची नासाडी होऊ नये, या मुद्द्यामध्ये तथ्य असले, तरी याविषयीचा योग्य तो निर्णय संबंधित अन्नपदार्थ उत्पादकांवरच सोपवायला हवा,'असे मतही खंडपीठाने व्यक्त केले. सध्या सुरु असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मान. शरद पवार यांनीही लक्ष घालून सरकारने चर्चेतून मार्ग काढावा, शेतकऱ्यांनी रस्त्यावर दूध ओतून आंदोलन करू नये असे आवाहन केले आहे.

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# छावा क्रांतिवीर सेनेचे वादळ नगर जिल्ह्यात तयार करण्यासाठी कामाला लागा

## छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांचे आवाहन

### १ जानेवारीला हजारो कार्यकर्त्यांनी नाशिकमध्ये वर्धापन यावे



**नाशिक । प्रतिनिधी**

सद्गुरु साईनाथांचे दर्शन घेत शहरात रॅलीच्या माध्यमातून शिर्डी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला पुष्पहार घालून छावा क्रांतिवीर सेनेच्या शिर्डी येथे होणाऱ्या पदाधिकारी मेळाव्याला सुरुवात केली. साई पालखी निवारा शिर्डी या ठिकाणी काल छावा क्रांतिवीर सेनेच्या ४ दिवसीय दौऱ्याची सांगता मोठ्या जल्लोषात संपन्न झाली. यावेळी छावा क्रांतिवीर सेनेचे वादळ नगर जिल्ह्यात तयार करण्यासाठी कामाला लागा असे आवाहन संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी केले.

शिर्डी येथे करण गायकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नगर जिल्हा विभागीय पदाधिकारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला प्रदेश महासचिव शिवाजीराजे मोरे, युवक प्रदेश सरचिटणीस नवनाथ शिंदे, राज्य उपाध्यक्ष सुभाष गायकर, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष मनोरमा पाटील, आयटी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव दळवी, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष महिला आघाडी संगीता सूर्यवंशी, उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष संदीप राऊत, महिला आघाडी उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष जयश्री वाकचौरे, नाशिक जिल्हाप्रमुख ग्रामीण नवनाथ वैराळ, जिल्हा सरचिटणीस सागर शेजवळ, विद्यार्थी आघाडी जिल्हाप्रमुख गिरीश आहेर, युवक जिल्हा उपाध्यक्ष करण शिंदे, महिला आघाडी नाशिक जिल्हा प्रमुख साधना गांगुर्डे यांच्या प्रमुख उपस्थितीत मार्गदर्शन मेळावा संपन्न झाला.

यावेळी महासचिव शिवाजीराजे मोरे यांनी सांगितले की, आज चार दिवसाचा दौरा करत असताना छावा क्रांतिवीर सेना प्रत्येक जिल्ह्यामध्ये ताकदीने मोठी होत असून सर्व पदाधिकारी तन-मन-धनाने संघटन वाढीसाठी काम करत असल्याचे सांगितले. यावेळी विद्यार्थी आघाडी जिल्हाप्रमुख गिरीश आहेर यांनी एक जानेवारी रोजी नाशिक येथे होणाऱ्या वर्धापन दिनाचे निमंत्रण दिले. अध्यक्ष भाषण करताना संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी जिल्हाप्रमुख अविनाश शिंदे यांचे विशेष कौतुक केले. छावा क्रांतिवीर सेनेत काम करत असताना कुठल्याही पक्षाच्या नेत्यांना घाबरायची गरज नाही. संघटन ही एक चळवळ आहे आणि त्या माध्यमातून तुम्ही केलेल्या प्रत्येक कामाच्या पाठीमागे संघटना ठामपणे उभी राहील असे आश्वासन दिले.

मेळावा यशस्वी करण्यासाठी जिल्हाप्रमुख अविनाश शिंदे, शिवाजीराजे चौधरी, नानकजी सावंत्रे, शुभम शिंदे, आकाश गाडे, संदीप वाघ, राहुल शिंदे, तुषार बाराते, युवक आघाडी उपजिल्हाप्रमुख प्रशांत सूर्यवंशी, जिल्हा संपर्कप्रमुख रेखा पाटील, जिल्हा सचिव सविता वाघ, रूपाली काकडे, निर्मला नारखेडे, सूर्यवंशी आदींसह सर्व पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

## गोपीनाथ मुंडे हे प्रस्थापिंता विरोधात लढण्याचे सामर्थ्य असलेले नेते – सावजी

**नाशिक ।** भारतीय जनता पक्षाचे दिवंगत नेते तत्कालीन केंद्रीय ग्रामविकास मंत्री लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना जयंतीनिमित्त भाजपा कार्यालय वसंतस्मृती, नाशिक येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणींना उजाळा देत अनेक पदाधिकाऱ्यानी आपले विचार मांडले. गोपीनाथ मुंडे हे प्रस्थापिंत अन्यायी शक्तीविरोधात लढण्याचे सामर्थ्य असलेले नेते होते असे सांगण्यात आले.

उर्जामंत्री म्हणूनही त्यांनी उर्जा खात्यात उल्लेखनीय कामगिरी केली. मुंडे केवळ एका वर्गाचे नसुन बहूजन नेता म्हणून त्यांना मान्यता होती. म्हणूनच ते खऱ्या अर्थाने लोकनेते ठरले. ते हयात नाही यावर आजही विश्वास बसत नाही. एक ही दिवस त्यांच्या आठवणीविना जात नसल्याचे भाजपाचे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी यांनी सांगितले. याप्रसंगी भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, नाशिक लोकसभा समन्वयक गिरीष पालवे, गणेश कांबळे, ड.मिनल भोसले, हेमंत शुक्ल, प्रदिप पाटील, राजेंद्र महाले, राजेश आढाव, प्रकाश चकोर, शिवाजी बरके आदींनी आपले विचार व्यक्त केले. यावेळी शहर सरचिटणीस काशिनाथ शिलेदार, ड.शाम बडोदे, देवदत्त जोशी, वसंत उशीर, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र मोरे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष अजय आघाव, उत्तम उगले, सुजाता करजगीकर, अमित घुगे, चंद्रकांत चिचोले, संदीप तांबे, निलेश घुगे, अमोल वराडे, नलिनी दराडे आदिंसह कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रोसेस जमा — ॲड. बी. आर. बैसाने

**जाहीर नोटीस**

**साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं. ४०८ / २०२३**

१) राकेश सदाशिव सोनवणे उ.व.-३९ वर्षे, धंदा- मजुरी
२) कल्पना सदाशिव सोनवणे उ.व.-४२ वर्षे, धंदा-घरकाम
दोन्ही रा. दत्त नगर, सामोडे, ता.साक्री, जि.धुळे
३) शारदा राजेंद्र बल्लक उ.व.-५६ वर्षे, धंदा-घरकाम
रा. ताहराबाद, ता. बागलाण, जि. नाशिक
४) सारिका संजय सावळे उ.व.-४२ वर्षे, धंदा-घरकाम
रा. कावळे, ता. साक्री, जि. धुळे
५) आशा गणेश भोगे उ.व.-४१ वर्षे, धंदा-घरकाम
रा. लोकमान्य नगर, पवन नगर, सिडको कॉलनी, नाशिक ... **अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कुणीही नाही** .... **सामनेवाला**

कै. हिराबाई सदाशिव सोनवणे
मृत्यु दि. २०/१०/२०२३ ... **मयत**

बॉम्बे रेग्युलेशन कायदा तखखख १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांनी मयत कै. हिराबाई सदाशिव सोनवणे यांचे कायदेशिर वारस ठरवून मिळणेकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि.कि. अर्ज साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. १०/१/२०२४ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क.स्तर) कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. हिराबाई सदाशिव सोनवणे यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अव्यये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुल घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : साक्री
दि. ०१/१२/२०२४

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय साक्री**
**सहायक अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय साक्री**

## सिद्धिविनायक मिशनतर्फे मोफत आरोग्य तपासणी

### पाचशेपेक्षा अधिक रुग्णांनी घेतला लाभ

**नाशिक । प्रतिनिधी**

सिद्धिविनायक मानव कल्याण मिशन यांच्यावतीने आयोजित केलेल्या संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात ५०० हुन अधिक रुग्णांनी लाभ घेतला.

सांगळे मॅटरनिटी हॉस्पिटल, सद्गुरु हॉस्पिटल, महालक्ष्मी क्लीनिकल लॅबोरेटरी तसेच लाईफ लाईन ब्लड बँक यांच्या सहकार्याने मोफत शिबिर झाले. यावेळी रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात सांगळे हॉस्पिटलच्या वतीने स्रीरोग तज्ञ डॉ. गायत्री सांगळे व बालरोगतज्ञ डॉ. धनंजय सांगळे यांनी महिलांच्या आणि बालकांच्या आरोग्याची तपासणी करून त्यांना मोफत वैद्यकीय उपचार व सल्ला यावेळी दिला. महालक्ष्मी क्लीनिकल लॅबोरेटरीच्या संचालिका डॉ. रूपाली गुट्टे यांनी मधुमेह तसेच रक्तगट तपासणी केली. सद्गुरु हॉस्पिटलच्या वतीने डॉ. धनंजय थोरात व डॉ. शिवा शर्मा यांनी आपले सहकारी योगिता महाजन, सुमन थोरात, जया गवळी, रवी चौधरी यांच्या सहकार्याने रुग्णांची तपासणी केली.

यावेळी संत साहित्याचे अभ्यासक व मार्गदर्शक डॉ. तुळशीराम गुट्टे,डॉ. चंद्रशेखर नामपुरकर, डॉ.नवनाथ घोलप,डॉ. रेखा पाटील यांनी तपासणी करून मार्गदर्शन केले.याप्रसंगी भाऊसाहेब निकम, श्याम पिंपरकर, स्मिता बोडके, सुरेखा केदारी, दत्तात्रेय आंबेकर, सतीश कापडणीस उपस्थित होते.स्वागत व प्रास्ताविक शाम पिंपरकर यांनी केले, सूत्रसंचालन शहराध्यक्ष दिलीप अहिरे यांनी केले तर सुनील फरताळे यांनी आभार मानले.

## आहार, व्यायाम, उपचाराची त्रिसूत्री ठेवेल मधुमेहाला दूर- डॉ. राणे

### श्री समर्थ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे व्याख्यान

**नाशिक । प्रतिनिधी**



भारत हा झपाट्याने मधुमेहाचे रूग्ण वाढत जाणारा देश म्हणून ओळखला जात असून याच मधुमेहाला थांबवायचे असेल तर उत्तम आहार, योग्य व्यायाम आणि वेळेवर उपचार या त्रिसुत्रीचा वापर करणे गरजेचे असल्याचे आवाहन नारायणी हॉस्पीटलचे मधुमेह व हृदयविकार तज्ञ डॉ. पंकज राणे यांनी केले आहे. यावेळी श्री समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ खुटवडनगर यांच्यातर्फे आयोजित 'मधुमेह आणि हृदयविकार' या विषयावरील जनजागृतीपर व्याख्यानात डॉ. राणे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष वसंतराव जाधव, उपाध्यक्ष सुरेश गांगुर्डे, सचिव काशिनाथ भदाने, खजिनदार देविदास कापडणीस, लोकज्योती जेष्ठ नागरिक मंचचे जितेंद्र येवले उपस्थित होते.

यावेळी डॉ. राणे म्हणाले की, भरपूर तहान लागणे, नेहमीपेक्षा भरपूर वेळा लघवीला जावं लागणं, जखमा फार संथपणे भरणं, दृष्टी कमकुवत होणं ही मुख्यत्वे मधुमेहाची लक्षणे असतात.

मधुमेह होऊ नये यासाठी स्वतःचं निरीक्षण करणं गरजेचं आहे. आपलं वजन, रक्तातील साखरेची पातळी, जीवनशैली यांचा विचार करणे महत्वाचे आहे. घरामध्ये मधुमेहने मागच्या पिढ्यांमध्येच प्रवेश केला केला आहे अशा लोकांना डायबेटिसचा धोका जास्त असतो. त्यांनी अधिक काळजी घेण्याची गरजेचे असल्याचेही डॉ. राणे यांनी सांगितले.

सुरुवातीला सचिव काशिनाथ भदाणे यांनी ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्याची माहिती प्रास्ताविकातून दिली. यावेळी श्री समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन सुरेश गांगुर्डे यांनी केले.

**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- मौजे धुळे ता. जि. धुळे पो. तु. धुळे येथील धुळे मनपा हद्दीतील मौजे महिंदळे ता.जि. धुळे येथील म.न.पा. हद्दीतील घर त्याचा गट क्रमांक/उपविभाग क्रमांक ८८/२/अ/२/१ पैकी प्लॉट नं. १४, त्याचे एकुण क्षेत्र १५६.५० चौ.मी. यापैकी पुर्वे क भागाचे क्षेत्र ९७ चौ.मी. १०४४ चौ. फुट यामध्ये आर.सी.सी. बांधीव घराचे क्षेत्र ४६.६० चौ.मी.व उर्वरीत बखळ जागेसह मधील निवासी तीन रूम आर.सी.सी. बांधीव घर व संडास बाथरूम व समोरील स्पेस, खिडक्या, दरवाजा, पी.ओ.पी., गेट, सह लिहुन घेणार यांना विक्री करण्याचे ठरलेले आहे. यासी चर्तु:सिमा खालीलप्रमाणे,

पुर्वेस- सुर्यवंशीचा खाली प्लॉट
पश्चिमेस -कविता संतोष कढरे यांचे राहते घर
उत्तरेस -ओपन स्पेस
दक्षिणेस -रस्ता

येणेप्रमाणे चतुः सिमेतील वर्णन केलेली मिळकत सदनिका पुर्ण कब्जेदार सदरी १) अब्राहम चीन्नया कोला २) अछला अक्रम कोला यांच्या मालकी व कब्जेउपभोगातील वरील वर्णनाची मिळकत आमच्या अशिलांनी कायम स्वरूपी खरेदीखत करणेकामी उपरोक्त बांधीव घर मिळकत तळजमीन, दगड, माती, तदंगभूत वस्तूसह कायमस्वरूपी खरेदी खताने खरेदी करण्याचा सौदा करार केला आहे त्यापोटी बयाणा रक्कम देखील अदा केलेली आहे.

तरी वर नमुद चतु:सिमेतील वर्णनाचा बखळ प्लॉटबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारची मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टांच, जप्ती, बक्षिस, मुख्त्यारपत्रान्वये हितसंबंध, सौदा, भाडेपट्टा हक्क अथवा वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था यांचा सदर मिळकतीवर बोजा असल्यास सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी हरकतीसह व कागदपत्रांसह नोंदवावी. ७ दिवसांचे आत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अगर हरकत न नोंदविल्यास आमचे गट क्रमांक/उपविभाग क्रमांक ८८/२/अ/२/१ पैकी प्लॉट नं. १४, त्याचे एकुण क्षेत्र १५६.५० चौ.मी. यापैकी पुर्वे कडील भागाचे क्षेत्र ९७ चौ.मी. १०४४ चौ. फुट यामध्ये आर.सी.सी. बांधीव घराचे क्षेत्र ४६.६० चौ.मी हा निर्बेज व निर्वेध आहे असे समजून खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करतील. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. त्यामुळे होणा-या खर्चास व परिणामास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या कागदपत्रे व माहितीच्या आधारे आमचे मार्फत दिले असे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दि. १२/१२/२०२३

**ॲड. निलेशकुमार भिमराव अहिरे**
भिम नगर, साक्री रोड धुळे
मो.नं. ७०५७००२१५७

## भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी आज नाशकात

**नाशिक ।** भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष (प्रदेश मुख्यालय) माधव भंडारी आज नाशकात येत असून ते भाजप प्रज्ञावंत मंच (बुध्दीजीवी प्रकोष्ठ) नाशिक महानगराच्या वतीने आयजित कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करणार आहेत. अशी माहिती भाजप नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव व नाशिक महानगर भाजप प्रज्ञावंत प्रकोष्तचे अध्यक्ष ॲड. श्रीधर व्यवहारे यांनी सांगितले.

आज बुधवार, दि.१३ रोजी दुपारी ४ वाजता व्हीएन नाईक फार्मसी कॉलेज, डोंगरे मैदानाजवळ, गंगापूर रोड, नाशिक येथे भाजप प्रदेश उपाध्यक्ष व विचारवंत माधवराव भंडारी यांच्या प्रमुख मार्गदर्शनात प्रज्ञावंत संमेलन संपन्न होत आहे. चेतन राजापूरकर यांनी संकलित केलेले इतिहासकालिन चलनांवरील श्रीरामांच्या मुद्रांचे 'श्रीरामछंद' चित्रप्रदर्शन आयोजित केले आहे. तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने हजर राहावे असे आवाहन महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव व प्रज्ञावंत प्रकोचे संयोजक ॲड. श्रीधर व्यवहारे यांनी केले आहे.

## मनसे रस्ते, आस्थापनातर्फे जिल्हाधिकाऱ्यांना कांदा निर्यात बंदी हटविण्याच्या मागणीचे निवेदन

**नाशिक । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदीची मुदत ३१ मार्च २०२४ पर्यंत केली असल्याने वाढविलेल्या निर्यात बंदीला स्थगिती द्यावी, या कायद्यामुळे कांद्याच्या भावात मोठी घसरण सुरु झाली आहे. त्यामुळे कांदा निर्यात बंदी तात्काळ उठवून नाफेड मार्फत कांदा खरेदी करण्यात यावा अशी मागणी मनसे रस्ते, आस्थापनातर्फे जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कांदा निर्यात बंदी उठवली तर यामध्ये केवळ व्यापारी वर्गाचाच फायदा होतो. कारण कांदा साठवण्यासाठी पुरेशी साधन-सुविधा या सर्व सामान्य शेतकरी वर्गाकडे नसतेच. या गोष्टीचा फायदा घेऊन शेतकऱ्यांकडून कमी भावाने व्यापारी कांदा खरेदी करून साठवून ठेवल्या जाणाऱ्या आस्थापना त्यांच्याकडे आहेत. परिणामी व्यापारी वर्गाचाच फायदा होतो. निर्यात बंदीमुळे जिल्ह्यात ठिकठिकाणी बाजार समित्यांचे लिलाव शेतकऱ्यांनी बंद पाडले आहेत. नाशिक जिल्ह्यातील लासलगाव, निफाड, दिंडोरी, येवला, बागलाण, नाशिक, नांदगाव या तालुक्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादक शेतकरी आहेत. निर्यात बंदीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये सरकारविषयी रोष निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोषाचे वातावरण पसरले आहे. काही ठिकाणी रास्ता रोको सारखी आंदोलने होत आहेत. व्यापारी संघटनेने तर बेमुदत लिलाव बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पुरेसा पाऊस न झाल्याने विकत पाणी आणून कांदा जगवला आहे. त्यात देखील नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे कांदा पिकासह विविध पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अवकाळी पावसानंतर ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळे रब्बी हंगाम पण धोक्यात आला आहे. परंतु दर नियंत्रणात आणण्यासाठी कांदा निर्यात बंदीला मुदतवाढ देण्याच्या पत्रकामुळे कांद्याच्या भावात घसरण झाली आहे.

## नाभिक समाज मंडळाचा वधु–वर मेळावा २५ रोजी

**नाशिक ।** सिडको परिसर नाभिक समाज मंडळ संचलित अक्षता वधु-वर सुचक मंडळाच्या वतीने वधु वर परिचय मेळाव्याचे आयोजन सोमवारी (दि.२५) डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. कामठवाडे येथील माऊली मंगल कार्यालयात सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेत हा मेळावा होणार आहे. इच्छुक वधु वरांची माहिती असणारी पुस्तिका प्रकाशित करण्यात येणार आहे. या पुस्तकात वधू - वरांचा तपशील समाविष्ट करता यावा याकरीता १५ डिसेंबरपर्यंत नाव नोंदणी करावी असे आवाहन अध्यक्ष कैलास शिंदे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९७६४५१९०९९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## मदतीचा हात ११२ : रेडीओ विश्वास तर्फे जनजागृती

**नाशिक । प्रतिनिधी**




दि. २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर जागतिक महिला हिंसाचार विरोधी पंधरवडा जगभर साजरा केला जातो याचे औचित्य साधून 'हिंसा को नो' या प्रकल्प अंतर्गत रेडीओ विश्वास आणि स्मार्ट संस्थे तर्फे चार वसाहतींमध्ये रॅली च्या माध्यमातून जनजागृती केली. या दरम्यान संबंधित पोलीस स्टेशन व संदीप युनिव्हर्सिटी चे विशेष सहकार्य लाभले.

रेडीओ विश्वास च्या समन्वयक ऋचिता ठाकूर यांनी सर्व उपक्रमाचे नियोजन केले., सदर रॅली अण्णाभाऊ साठे नगर, माळी गल्ली, वडाळा गांव, कस्तुरबा नगर आणि भारत नगर याठिकाणी काढण्यात आली, दोनशे हून अधिक महिलांनी यात सहभाग नोंदवला. महिलांसोबत काम करत असलेल्या त्या त्या भागातील पोलीस स्टेशन च्या महिला पोलीस कर्मचारी सुद्धा या रॅलीत सहभागी झाल्या. स्वतः च्या हक्कासाठी, सन्मानासाठी महिला पहिल्यांदाच घराच्या बाहेर पडून उत्साहाने घोषणा देत होत्या. 'हिंसा को नो 'या प्रकल्प अंतर्गत ठराविक महिलांपर्यंतच माहिती पोहचली जाते, मात्र या पंधरवाड्या निमित्त वसाहती मधील सर्वांना याची माहिती मिळावी तसेच गरजू महिलांना अप्रत्यक्षपणे सांगण्यात आले, कि लक्षात ठेवा मदतीचा हात ११२. प्रत्येक रॅली मध्ये एक विशेषता दिसून आली. अण्णाभाऊ साठे नगर वडाळा गांव येथील युवकांनी स्वतः पुढाकार घेत रॅली चा प्रारंभ केला. माळी गल्ली मधील रहिवासी लोकांनी रॅली ला पाठींबा दिला, भारत नगर मधील महिलांचे विशेष कौतुक यासाठी कि महिला संख्या कमी असून सुद्धा महिलांनी इतर महिलांना प्रोत्साहन दिले कस्तुरबा नगर रॅली मध्ये वसाहतीतील युवकांनी विशेष सहकार्य केले. रॅली नंतर सरकार वाडा पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक दिलीप ठाकूर उपस्थित होते त्यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले, व सरकार वाडा पोलीस स्टेशन तुमच्या साठी सदैव तत्पर असेल अशी ग्वाही दिली.

जागतिक महिला हिंसाचार विरोधी पंधरवडा निमित्त रेडीओ विश्वास वर आगळ्या वेगळ्या पद्धतीची मालिका सादर करण्यात आली, श्रोत्यांनी या माहितीपूर्ण मालिकेची पर्वणी साधली, या मालिकेत नाशिक शहराचे गुन्हे व अन्वेषण शाखेचे डी.सी.पी. यांच्या मार्फत नाशिक मधील गुन्हांची स्थिती जाणून घेण्यात आली. तसेच दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर तथा सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वन स्टॉप सेंटर, सुरक्षा अधिकारी, महिला हक्क संरक्षण समिती, भरोसा सेल, महिला व बाल सहाय कक्ष यांच्या मार्फत त्या त्या विभागाचे कार्य कसे चालते, एखाद्या पिडीत महिलेला कसा न्याय त्या विभागामार्फत मिळतो किंवा त्यांच्या विभागात असणाऱ्या सुविधांची माहिती अशी सर्व माहिती असलेली मुलाखत प्रसारित करण्यात आली. या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी सागर नागरे, छाया साबळे, अलका शेळके, ज्ञानेश्वर शिरसाठ, श्रद्धा कराळे, देविका गोसावी आणि ममता जाधव यांनी मेहनत घेतली.

ॲड. प्रविण डी. चौधरी, धुळे

**जाहीर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्तर यांचे कोर्टात**

**दि.कि.अ.नं. १४१२/२०२३**

१. श्रीमती मथुराबाई यशवंत पाटील उ.व.-७९ वर्ष, धंदा-घरकाम
रा.निमखेडी ता.जि.धुळे
२. सौ.आशाबाई रमेश पाटील उ.व.-४७ वर्ष, धंदा-घरकाम
रा.शेंदुर्णी ता.जि.जळगाव
३. सौ.छायाबाई रविंद्र पाटील उ.व.-४२ वर्ष, धंदा-घरकाम
४. राजेंद्र यशवंत पाटील उ.व.-५१ वर्ष, धंदा-शेती
५. सुभाष यशवंत पाटील उ.व.-४८ वर्ष, धंदा-शेती
६. प्रकाश यशवंत पाटील उ.व.-५१ वर्ष, धंदा-शेती
नं. ३ ते ६ सर्व रा.मु.कुंडाणे पो.वरखेडे, ता.जि.धुळे ... **अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** .... **सामनेवाला**

**आणि**

कै.यशवंत मोतीराम पाटील(मयत) मयत दि.३०/१२/२०१९
मृत्यु ठिकाण - कुंडाणे, पो.वरखेडे ता.जि.धुळे ... **मयत**

ज्याआर्थी अर्जदार उपरोक्त न्यायालयात कै.यशवंत मोतीराम पाटील(मयत) यांचे अर्जदार ही कायदेशीर वारस असुन वारस दाखला हा शासकीय, निमशासकीय कामासाठी तसेच इतर खाजगी कामाकरीता तसेच वेळोवेळी आवश्यक त्या ठिकाणी वारस दाखला आवश्यक असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. ५/१२/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ.दि.२२/०१/२०२४ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैर संबंधीतांना कळविण्याम येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो.क.स्तर कोर्ट २. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे.कोर्टात दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण - धुळे
दि.११/१२/२०२३

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **दिवाणी न्यायालय सो. व.स्तर धुळे**
आदेशावरुन **अधिक्षक,** — **दिवाणी न्यायालय सो. व.स्तर धुळे**

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# छावा क्रांतिवीर सेना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणार

## सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांचे नाशिक मध्ये आवाहन














नाशिक । छावा

क्रांतिवीर सेनेचा सोलापूर जिल्ह्यामध्ये पदग्रहण सोहळा व मार्गदर्शन मेळावा मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला. सिद्धेश्वर नगरीमध्ये छत्रपती शिवरायांच्या स्मारकाला हार घालून छावा क्रांतिवीर सेनेचा मेळाव्याला सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला शासकीय विश्रामगृह या ठिकाणी प्रमुख पदाधिकाऱ्यांसोबत सोलापूर जिल्ह्यामध्ये संघटना वाढीसाठी तसेच विविध विषयांवर चर्चा करून पदाधिकाऱ्यांना छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर शिवस्मारक सभागृह शिंदे चौक सोलापूर या ठिकाणी संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या नेतृत्वाखाली तसेच प्रदेश महासचिव शिवाजीराजे मोरे, प्रदेश संपर्कप्रमुख नितीन शिंदे, शेतकरी आघाडी प्रदेशाध्यक्ष पंकज जराड पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सुभाष गायकर, प्रदेश चिटणीस धनराज लटके, प्रदेश सहसंपर्कप्रमुख गणेश दादा माने, प्रदेश उपाध्यक्ष पांडुरंग मामा मोरे, महिला आघाडी प्रदेश उपाध्यक्ष प्रगती तिवारी, आयटी सेल विभाग राज्य संपर्कप्रमुख वैभव दळवी, महाराष्ट्र युवक अध्यक्ष हर्षद भोसले, पश्र्चिम महाराष्ट्र युवक उपाध्यक्ष पप्पू श्रीसागर, शेतकरी आघाडी पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष हनुमंत तात्या डुबल, नाशिक जिल्हा सरचिटणीस सागर शेजवळ, जालना जिल्हा प्रमुख राम पाटील गाडेकर, युवक जिल्हाप्रमुख गजानन पाटील ढवळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

CMYK
दैनिक
लक्ष महाराष्ट्र
धुळे-नंदुरबार-नाशिक





# मालपूर,कासारे,आयाने,फोफरे येथे विकसित भारत संकल्प यात्रा संपन्न

## ग्रामस्थांना विविध योजनांची माहिती देऊन केली जनजागृती



























धुळे।
विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून ग्रामस्थांना केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती एलईडी व्हॅनमार्फत देण्यात आली. तसेच लाभार्थ्यांकडून विविध योजनांचे अर्ज भरुन घेण्यात आले. यात्रेदरम्यान निश्चित केलेल्या तपशीलांद्वारे संभाव्य लाभार्थींची नोंदणी करणे, ही या विकसित भारत संकल्प यात्रेची उद्दिष्टे आहेत. सुरुवातीला यात्रेचे स्वागत ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांच्यावतीने करण्यात आले. फोफरे येथील १०५ नागरिक, आयने १०९ तर मालपूर येथील कार्यक्रमांत २५० पेक्षा जास्त नागरिक उपस्थित होते. फोफरे १२८, आयने २३, मालपूर एक अशा दीडशे पेक्षा जास्त लाभार्थ्यांना प्रधानमंत्री उज्वला योजनेचा लाभ दिला. यावेळी आयुष्मान भारत कार्डची नोंदणी करण्यात आली. आरोग्य शिबिरात टी.बी व सिकलसेलची तपासणी करण्यात आली. तसेच या कार्यक्रमांत नागरिकांनी विकसित भारत संकल्पनेची शपथ देण्यात आली. यावेळी प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, प्रधानमंत्री आवास योजना, शेडनेट, सिंचन विहीर, रमाई घरकुल योजनेची माहिती नागरिकांना देण्यात आली.

संकलन : दिपक वाघ